पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
Pune metropolitan Regional Development Authority,Pune
स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे –४११०६७
पुणे महानगर
S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 067
Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: hqpmrda@gmail.com

# भोगवटा प्रमाणपत्र

**( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )**

**जा.क्र : DP/बीएचए//मौ.वाघोली/ग.नं.९०५+९०६+९२६+१०८५,भू.क्र. १ ते ५/प्र.क्र. १८/१७-१८/दि.**१५/१०/२०१८

**प्रति,**

मे.कारिआ रिॲल्टी तर्फे श्री. समित नितीन कारिआ व इतर
रा-२०४+२०५, गेरा ७७, बिशप स्कूल जवळ, कल्याणीनगर, पुणे- ०६

मौजे -वाघोली, तालुका-हवेली, जिल्हा पुणे येथील ग.नं. ९०५+९०६+९२६+१०८५, भू.क्र. १ ते ५, क्षेत्र-४२७००.०० चौ.मी. या जागेवर इमारतीचे सुधारित बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/७६३/२०१४, दि- १९/०९/२०१४ तसेच प्राधिकरणाकडील विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र क्र. १८/१७-१८, दि-१६/०६/२०१७ अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. अनिल सायकर लायसन्स नं.CA/९२/१४४८८ परवानाधारक वास्तुविशारद / स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि-०८/०८/२०१८ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

## उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

**१) मंजूर नकाशातील इमारत क्र. आय =पार्किंग + १२ मजले (एकूण सदनिका ४८ + आठव्या मजल्यावरील रेफ्युज एरिया )**

**२) मंजूर नकाशातील इमारत क्र. जे =पार्किंग + १२ मजले (एकूण सदनिका ४८ + आठव्या मजल्यावरील रेफ्युज एरिया )**

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**

१) ग्रामसेवक, मौजे-वाघोली, ता-हवेली, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-२५/१०/२०१८ रोजीचे पत्र क्र. १८/१७-१८ सोबतचे**

## परिशिष्ट ' ब '

१) अर्जदार /सदनिका धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) उंच इमारतींच्या अनुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील पत्र. क्र. FFH/७२/२०१८ , दि-२०/०८/२०१८ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तीची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/विकासक मे.कारिआ रिॲल्टी तर्फे श्री. समित नितीन कारिआ यांनी दि-२५/०७/२०१८ रोजी रुपये-२००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

६) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/ विकासक/ जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) विषयांकित प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले एकूण (Gross FSI+ Non FSI) बांधकाम क्षेत्र-६८,७२८.९२ चौ.मी. आहे. तथापि, या प्रकल्पामध्ये अनुज्ञेय होणारे एकूण कमाल (Gross FSI+Non FSI) बांधकाम क्षेत्र सुमारे ९०,०९७.०० चौ.मी. आहे. त्यामुळे या प्रकल्पास पर्यावरण विभागाकडील State Environmental Impact Assessment Authority कडून Environment Clearance प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अर्जदार /विकासक / जमीनमालक यांनी यापूर्वी पर्यावरण विभागाकडील दिनांक १६/०३/२०१५ रोजीचे पत्र क्र. SEAC/२०११/CR/७८/TC-II अन्वये प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये एकूण (Gross FSI+ Non FSI) ७२,५५१.६३ चौ.मी.बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्यात आले आहे. सबब या प्रमाणपत्रामध्ये नमूद बांधकाम क्षेत्राचे वरील बांधकामास सुधारित Environment Clearance प्रमाणपत्र प्राप्त झालेशिवाय उर्वरित बांधकाम /विकास करता येणार नाही. सदर अट प्रकल्पाचे अर्जदार/ विकासक/ जमीनमालक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील. तसेच पर्यावरण विभागा कडील परिपत्रक क्र.SEIAA-२०१४/CR-०२/TC-३, दि-३०/०१/२०१४ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे प्रकल्पाचे अर्जदार /विकासक/ जमीनमालक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

८) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे. अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता